सं.फौ.ख.–६३/२०१४

शासन –वि.– विकास **नि.क्र.१६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा पुरावा**

**मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | महेश बाजीराव ससे, |
| वय | – | ४३ वर्षे, |
| हुद्दा | – | वनरक्षक, |
| नेमणुक | – | वनविभाग प्रादेशिक, राहुरी |

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री. पी. के. पाटील यांचे मार्फत</u>–**

दिनांक ३१/०७/२०१३ रोजी मी वनरक्षक म्हणुन वनविभाग चिकलठाण येथे नेमणूकीस होतो. सदरील रोजी पाहणी करीत असताना बिरोबा माळ येथे सर्व्हे नं. ३१ गट नं. ६० येथे आरोपी नामे विकास पांडुरंग काकडे हे शेती करण्याच्या उद्देशाने जे.सी.बी. च्या सहाय्याने जंगलातील झाडांची मोडतोड करीत होते. त्यांनी १ हे. ६० आर एवढ्या क्षेत्रातील झाडे तोडली होती. माझा जबाब नोंदविण्यात आला होता. आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी तो न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. इ. आर. खपके यांचे मार्फत</u>** –

जानेवारी २०१३ ते ०२/०८/२०१३ पर्यंत मी चिकलठाण या भागात कार्यरत होतो. माझा जबाब बिरोबा माळ येथे नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब वन परिमंडळ यांच्या कार्यालयात म्हैसगाव येथे झाला. सदरील सर्व्हे नंबर ३१ चे संपुर्ण क्षेत्र ३५५ हे. ७० आर एवढे आहे. गट क्र. ६० चे एकुण क्षेत्र २१५ हे. २५ आर एवढे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील गट क्रमांक व सर्व्हे क्रमांक मध्ये सर्व जंगली झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व झाडांची नोंद वनविभागाच्या कार्यालयात असते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या झाडांची लागवड वनविभागामार्फत करण्यात आली आहे त्यांची नोंद वनविभागाच्या कार्यालयात असते. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येतील. चारही बाजुने राखीव वनक्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला डोंगराळ भाग असुन जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ असलेली जागा आरोपीला सरकारने दिलेली असुन त्यानुसार ७/१२ पत्रकावर नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या नावाची नोंद इतर हक्कात

आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व इतर नागरीकांनी शासनाकडे जमिन कसण्यासाठी मिळावी म्हणुन अर्ज केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील नागरीकांना जमीन मिळु नये म्हणुन आम्ही खोटी कार्यवाही करुन खोटा पुरावा गोळा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, झाडे तोडताना मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेले नाही. दि. ३१/०७/२०१३ रोजी आरोपीने झाडे तोडली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी झाडे तोडताना पाहिल्यानंतर लेखी रिपोर्ट वरिष्ठांकडे ठेवलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१/०७/२०१३ रोजी मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANUPAMA CHANDRASHEKHAR PARSHETTI
Date: 2025.06.24 10:44:30 +0530

**(श्रीमती अनुपमा चं. पारशेट्टी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.१, राहुरी

दिनांक – २३/०६/२०२५.